बातम्या व
जाहिरातीसाठी
संपर्क साधा
* संपर्क *
मो. 9421505122

साप्ताहिक
# मनमाड थिंणगी

https://manmadthinagi.com/news

संस्थापक संपादक : स्व.प्रकाशजी गोयल     संपादक : तुषार गोयल

22k 916
हॉलमार्क सर्टीफाईड
बिनघटीचे दागिने
शुध्दता आणि विश्वास
100%
BIS Approved
Hallmarked Jewellery
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड
तुषार गोयल ९४२१५०५१२२
दिपक गोयल ९९६०९३१४१४

RNI Regd.No.91032/90 (Delhi)   वर्ष ३४ वे   अंक ६ वा.   वार : रविवार दि.५ मार्च २०२३   पाने ४   किमत ५ रू.

# ३६ हजाराची लाच स्वीकारतांना मनमाड न.पा.चे तीन कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

मनमाड : मनमाड नगरपरिषद लेखा विभागातील तीन जणांना शुक्रवार दि.३ रोजी ३६ हजार रूपयांची लाच घेतांना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडले आहे.

मनमाड नगरपरिषदेत काम करत असलेल्या कन्स्ट्रक्शन फर्म चे बिल जमा करण्यास तक्रारदार हे आलेले होते. संबंधित कामाच्या बिलाचा चेक तयार करून चेक काढून दिल्याच्या मोबदल्यात लेखा विभागातील १) आनंद प्रभाकर औटी, वय ४६ वर्ष, वरिष्ठ लिपिक, लेखा विभाग, नगरपरिषद, मनमाड. २) संजय बबन आरोटे वय ५२ वर्ष. व्यवसाय -रोखपाल, लेखा विभाग, नगर परिषद मनमाड, ३) नंदू पंडीत म्हस्के वय ५८ वर्ष. व्यवसाय- शिपाई. लेखा विभाग नगर परिषद मनमाड यांनी दि.२।३।२०२३ रोजी टक्केवारीनुसार ३६ हजार रूपये लाचेची मागणी केली



होती. म्हणून त्रस्त तक्रारदारा तर्फे लाच लुचपत प्रतिबंध विभाग नाशिक यांना तक्रार केल्यानंतर दि.३।३।२०२३ रोजी लाच लुचपत प्रतिबंध विभाग नाशिक यांनी सापळा रचून कारवाई केली.

या कारवाईत मनमाड नगरपरिषद लाच खोर कर्मचारी यांना ३६,००० रू लाच स्विकारतांना अटक करण्यात आली व ३६,००० मुद्दे माल हस्तगत करण्यात आला आहे. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

ही कारवाई नाशिक अँन्टी करप्शन ब्युरो, पोलीस निरीक्षक अनिल बागुल, सापळा पथक पो. ना. किरण अहिरराव, पो.ना.अजय गरूड, चा.पो.ना. परशुराम जाधव, अँटी करप्शन ब्युरो, नाशिक यांनी केली.

सदर कारवाई ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र पोलीस अधिक्षक सौ.शर्मिष्ठा घारगे-वालावलकर, व ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र अप्पर पोलीस अधिक्षक एन.एस.न्याहळदे, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र वाचक पोलीस उपअधिक्षक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कोणत्याही शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन लाच लुचपत प्रतिबंध विभागात तर्फे नागरीकांना करण्यात आले आहे.

# बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्डाचा दिलासा इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्याला मिळणार गुण

मनमाड : सध्या सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षेतील इंग्रजी विषयाच्या पेपरमधील त्रुटींबाबत महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शुक्रवारी जाहीर केला. त्यानुसार इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेतील संबंधित त्रुटी असलेला प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक प्रश्नाचे दोन याप्रमाणे एकूण सहा गुण देण्यात येणार असल्याचे मंडळाने जाहीर केले आहे. राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळामार्फत बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी इंग्रजी विषयाचा पेपर होता. या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत कवितेवर आधारित प्रश्नात ए-३ आणि ए-५ क्रमांकाचे प्रश्न राज्य मंडळाकडून छापण्यात आले नव्हते, तर ए-४ क्रमांकाचा प्रश्न विचारण्याऐवजी तेथे उत्तर छापण्यात आल्याचे समोर आले. त्यामुळे परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत झालेल्या छपाईतील चुकीबाबत राज्य मंडळाने यापूर्वीच दिलगिरी व्यक्त केली आहे. दरम्यान, पेपरमधील त्रुटींबाबत नियामक मंडळाच्या अहवालानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे राज्य मंडळाने जाहीर केले. परंतु कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बहिष्कारामुळे नियामक मंडळाची बैठक गेल्या ११ दिवसांत होऊ शकली नाही. शिक्षणमंत्र्यांसमवेत गुरुवारी झालेल्या बैठकीनंतर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी बहिष्कार मागे घेतला. त्यानंतर इंग्रजी विषयाच्या पेपरबाबत प्रमुख नियामकांची सभा घेण्यात आली.

इंग्रजी प्रश्नपत्रिकेमध्ये त्रुटी, चुका असल्याचे इंग्रजी विषयाच्या संयुक्त

पान २ वर....

# १ एप्रिलपासून सोने दागिन्यांवर हॉलमार्किंग, HUID अनिवार्य - सरकारने जारी केला आदेश

मुंबई : सोने आणि दागिन्यांची खरेदी आणि विक्री करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आली असून ग्राहक व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे की ३१ मार्च २०२३ नंतर HUID हॉलमार्किंगशिवाय सोने आणि दागिने विकले जाणार नाहीत. ग्राहक व्यवहार विभागाने सांगितले की, ४ अंकी आणि ६ अंकी हॉलमार्किंगबाबत ग्राहकांमधील संभ्रम दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

हा नियम १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार असून नवीन निर्णयानंतर १ एप्रिल २०२३ पासून फक्त ६ अंकी अल्फान्यूमेरिक हॉलमार्किंग वैध असेल. त्याशिवाय सोने आणि दागिने विकले जाणार नाहीत.

ग्राहक हिताच्या दृष्टीने ग्राहक व्यवहार विभागाचा हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे. ४ अंक असलेले हॉलमार्किंग पूर्णपणे बंद केले जाईल. गोल्ड हॉलमार्किंग अनिवार्य करण्यासाठी सरकारने दीड वर्षापूर्वी तयारी सुरू केली होती. देशात १,३३८ हॉलमार्किंग केंद्रे असून ३३९ केंद्रे आहेत जी सोने उत्पादन/उत्पादन करतात. त्या सर्व भागात इखड केंद्रे उपलब्ध आहेत. देशात आता १,३३८ हॉलमार्किंग केंद्रे आहेत. या केंद्रांद्वारे ८५%पेक्षा जास्त क्षेत्र व्यापले गेले आहे. लवकरच आणखी केंद्रे स्थापन केली जातील.

HUID क्रमांक काय आहे?

ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या ओळखीसाठी आधार कार्ड आहे, त्याचप्रमाणे दागिन्यांच्या ओळखीसाठी हॉलमार्क युनिक आयडेंटिफिकेशन (HUID) क्रमांक असतो. हॉलमार्क युनिक आयडेंटिफिकेशन (HUID) क्रमांक हा सहा-अंकी अल्फान्यूमेरिक कोड आहे ज्यामध्ये अंक आणि अक्षरे असतात, जे ज्वेलर्सद्वारे नियुक्त केले जातात. या क्रमांकाच्या मदतीने दागिन्यांशी संबंधित प्रत्येक माहिती उपलब्ध होते. जसे दागिन्यांची शुद्धता, वजन आणि ते कोणी विकत घेतले. ज्वेलर्सना ही माहिती BIS पोर्टलवर देखील अपलोड करावी लागेल. हॉलमार्किंगच्या वेळी दागिन्यांच्या प्रत्येक तुकड्याला HUID नियुक्त केले जाईल आणि ते दागिन्यांच्या प्रत्येक तुकड्यासाठी वेगळा असेल. Assaying and Hallmarking Center (AHC) मध्ये, दागिन्यांवर एक युनिक क्रमांकाचा शिक्का मारला जातो.सोन्याचे हॉलमार्किंग हे मौल्यवान धातूच्या शुद्धतेचे प्रमाणपत्र आहे. हे १६ जून २०२१ पर्यंत स्वेच्छेने लागू होते. यानंतर सरकारने सोन्याचे हॉलमार्किंग अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला.

पहिल्या टप्प्यात देशातील २५६ जिल्ह्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यात आणखी ३२ जिल्हे जोडण्यात आले. आता त्यात देशातील आणखी ५१ जिल्हे जोडले जात आहेत. अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्री पियुष




गोयल यांनी शुक्रवारी भारतीय मानक ब्युरो (इखड)ची आढावा बैठक घेऊन BIS ला देशात चाचणीसाठी पायाभूत सुविधा वाढवण्याचे निर्देश दिले. याशिवाय बीआयएसला उत्पादन चाचणी आणि बाजार निरीक्षणाची वारंवारता वाढवण्यास सांगितले होते. त्यांनी इखड ला प्रेशर कुकर, हेल्मेट आणि इतर ग्राहक उत्पादने यांसारख्या विविध उत्पादनांसाठी बाजारपेठेतील देखरेख वाढवण्याचे निर्देश दिले. गोयल म्हणाले की, भारतातील सर्व उत्पादने सर्वोच्च गुणवत्ता आणि सुरक्षितता मानकांची पूर्तता करतात का याची खात्री करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

# मनमाड नगर परिषद शाळा इमारत नूतनीकरण कामांचे भूमिपूजन सौ.अंजुमताई सुहास कांदे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न

मनमाड : आमदार सुहास कांदे यांच्या माध्यमातून नगर विकास विभाग वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत नांदगाव व मनमाड शहरातील नगरपरिषद शाळा इमारतींच्या नूतनीकरणासाठी दहा कोटी रूपये मंजूर झाले असून या कामाचे भूमिपूजन सौ.अंजुमताई सुहास कांदे यांच्या हस्ते करण्यात आले.




मनमाड शहरातील विविध नगरपरिषद शाळांना भेट दिल्यानंतर शाळांच्या इमारतींचे मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याचे निदर्शनास आले तसेच इमारत परिसरात सुशोभीकरण करणे व उत्तम वातावरण असणे गरजेचे असल्याने संबंधीतांनी ही संकल्पना आमदार सुहास अण्णा कांदे यांच्याकडे मांडली असता आ.कांदे यांनी याबाबत तात्काळ दखल घेत निधीसाठी पाठपुरावा केला असता नगर विकास विभागाअंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण योजनेत मनमाड सह नांदगावच्या नगरपरिषद शाळांना एकूण दहा कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. व आता न.पा. शाळा इमारतीच्या नूतनीकरणाच्या कामांचे भूमिपूजन झाले झाले असून लवकरच शाळांचे नूतनीकरण करण्यात येईल आणि मुलांना स्वच्छ सुंदर असलेल्या इमारतीत शिक्षण घेण्यासाठी चांगले वातावरण निर्माण होईल, असे मत सौ.अंजुमताई कांदे यांनी यावेळी सांगितले.

मनमाड शहरातील नगर परिषदेच्या विविध शाळांमध्ये सौ. अंजूमताई कांदे व पदाधिकाऱ्यांचे ढोल ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांनी स्वागत केले. आमदारांच्या माध्यमातून निर्माण होत असलेल्या शाळांच्या इमारत नूतनीकरणाबद्दल शिक्षकांनी व

पान २ वर....

# शरीरसौष्ठव स्पर्धा संपन्न ८५ स्पर्धकांचा सहभाग




मनमाड : नाशिक जिल्हा हौशी शरीरसौष्ठव असोसिएशनच्या मान्यतेने अफजलभाई समीर शेख, अविनाश चोपडे यांच्या पुढाकाराने ए.के.फिटनेस आयोजित सिनियर रेल्वे इन्स्टिटयूट ,मनमाड येथे झालेल्या भव्य जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव तथा मेन्स फिजिक्, मास्टर्स व दिव्यांग स्पर्धा मनमाड क्लासिक २०२३ चा किताब इगतपुरीच्या रवि भागडे याने पटकावला तर बेस्ट पोजर नाशिकच्या पियुष केदारे यांने मिळविला.

स्पर्धेचे उद्‌घाटन नॅशनल वेटलीफ्टिंग कोचप्रविण व्यवहारे सर, माजी शरीरसौष्ठवपट्टू भगवान सोनवणे,जिल्हा सरचिटणीस: गोपाळ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नाशिकचे नामवंत कर्करोग तज्ञ डॉ.मुकुल घरोटे, मि.वर्ल्ड रौप्यपदक विजेता योगेश निकम गणेश धात्तक, नगरसेवक बब्बु कुरेशी, राजाभाऊ आहीरे, बन्टि फुलवानी, संजय निकम, दिपक गोगड़, साईनाथ गिडगे, सुनिल पाटिल, इरफान मोमीन, मजीद दादा शेख, मयुर बोरसे, कलिम पठान, आझाद पठान, अन्वर खान, इस्माईल शेख आदी मान्यंवर उपस्थित होते.

स्पर्धेत संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील नाशिक, मनमाड, मालेगांव, नांदगाव, येवला, ईगतपुरी, त्रंबकेश्वर, वणी-दिंडोरी, सिन्नर, निफाड, भगूर आदी ठिकाणाहून एकूण ८५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत पंच म्हणून नाशिक जिल्हा हौशी शरीरसौष्ठव असोसिएशनचे सरचिटणीस: गोपाळ गायकवाड, गोपीनाथ रोडे, श्रीराम जाधव, अमोल जाधव, संकेत घोडके,अफजलभाई खान, अमन शेख तर गुणलेखन दिग्विजय गायकवाड, सुत्रसंचालनगोपाळ गायकवाड यांनी केले.

स्टेज मार्शल म्हणून :रामदास पोमनार,चेतन ढासे,अरबाज शेख, यांनी कार्य पार पाडले. मनमाड क्लासिक २०२३ स्पर्धेचा निकाल - दिव्यांग गट : प्रथम: हुसेन कुरेशी, नाशिक. दुसरा : गुलाब सय्यद, जय बजरंग व्या.शाळा, मनमाड

मास्टर गट निकाल - प्रथम : मुस्ताक शेख,भुमी अभिलेखा विभाग,महाराष्ट्र शासन. दुसरा : श्रीराम जाधव,जेलरोड नाशिक. तिसरा : डॉ.अर्जुन लोणारी,येवला. चौथा : कदीर पठाण,ए.के फिटनेस, मनमाड. पाचवा : परवेज अख्तर, मालेगाव, सहावा:सुनील चुनियन,मनमाड, सातवा:संदिप महीरे, नांदगाव.

मेन्स फिजिक् गट निकाल - मन्सुरी शाज,फिटनेस लिगेसी,नाशिक, अजय निषाद,ए जे फिटनेस,सातपूर. नवाज तांबोळी,ए.के फिटनेस, मनमाड, अब्दुल सादिक, बिगस्ट्रांग, मालेगाव, हिमांशू हबीब, येवला. ५५-६० किलो वजनीगट निकाल रवी भागडे, हितेश ऑलिंपियाजिम, इगतपुरी, चैतन्य दुबे ए.जे.फिटनेस,सातपूर, सरफराज अन्सारी,हितेश ऑलिंपियाजिम, इगतपुरी, मंगेश नागरे, आर्मस्ट्रॉंग जिम,लासलगाव, मोहम्मद अब्दुल्ला, बिग स्ट्रॉंग,मालेगाव.

६० ते ६५ किलो वजनीगट निकाल- आकाश दुबे, ए.जे.फिटनेस नाशिक, नवाज तांबोळी, ए.के.फिटनेस मनमाड, मयूर चौधरी, रॉयल फिटनेस, मनमाड, दीपक जगताप, गुगल फिटनेस, नाशिक, शुभम पैंजाणे, प्रेम जिम, येवला. ६५-७० किलो वजनी गट निकाल करण पाटील, रोअर जिम, नाशिक, अजय निसाद, ए.जे.फिटनेस, नाशिक, दर्शन वाघमारे, ओझर फिटनेस, ओझर. राकेश देवरे,ए.जे.फिटनेस, अंबड शाखा, नाशिक. प्रथमेश कुलकर्णी, स्ट्रेंथ, हब, येवला. ७० ते ७५ किलो वजनी गट प्रथम सचिन लोखंडे, एम टी जिम, त्रंबकेश्वर, अमिन अंसारी, फिटनेस लिगेसी, नाशिक, रितेश पळशीकर, ए.के.फिटनेस, मनमाड शरद गाढवे, के.एफ.सी.जिम, भगूर, साहिल शेख, मौलाबाबा, नाशिक. ७५ किलो वरील वजनी गट प्रथम: दीपक डंबाळे, ऑक्सिजन फिटनेस अंबड, शायबाज शेख, मौलाबाबा नाशिक आकाश झाकणे, एकलव्य जिम, जेलरोड, समीर पटेल एब्ज् फिटनेस, नाशिक, पियुष केदार, ए.जे फिटनेस, नाशिक. बेस्ट पोजर : पियुष केदार. मनमाड क्लासिककिताब विजेता : रवी भागडे, इगतपुरी.

## पाहिजेत

साप्ता.मनमाड ठिणगी तसेच ठिणगी न्यूज पोर्टल माध्यमांचे प्रतिनिधी तसेच जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहेत.
वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
**दिपक गोयल** (जाहिरात व्यवस्थापक)
सराफ बाजार, मनमाड मो.९९६०९३१४१४

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, तुषार प्रकाश गोयल यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव येथे छापून पूनम पब्लिसिटी गोयल बिल्डींग, मनमाड ४२३ १०४, जिल्हा नाशिक येथे प्रसिध्द केले. मो.९४२१५०५१२२ (मनमाडच्या न्यायकक्षेत्र) **संपादक : तुषार प्रकाश गोयल**

# भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास नांदगाव तालुका तर्फे ८ मार्चला आंदोलन

मनमाड : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील सर्व ११ लाखाहून अधिक ठेवीदारांच्या सुमारे दोन हजार कोटींच्या ठेवी अडकलेल्या आहेत, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक २०१६ पासून बँक आर्थिक अडचणीत आल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील सर्व ठेवीदार व खातेदारांना त्यांचे जमा पैसे परत मिळावे या करीता, पद्मभूषण मा.अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास नांदगाव तालुका यांच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत, आंदोलना पुर्वी विभागीय सहनिबंधक श्री.गावडे, जिल्हा बँकेचे प्रशासक श्री.चव्हाण, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पिंगळे यांच्याशी दि.२८ फेब्रुवारी रोजी बैठक संपन्न झाली. परंतु बैठकीत जिल्ह्यातील सर्व ठेवीदार व खातेदार यांना त्यांची स्वतःची जमा रक्कम परत देण्यास सर्व अधिकारी यांनी असमर्थता दाखवली आहे, व चर्चे तून कोणताही निर्णय न झाल्यामुळे नाईलाजाने ठेवींची रक्कम परत मिळावी या करीता आंदोलन करावे लागनार आहे, धरणे आंदोलन दि.८ मार्च २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता सुरू होणार आहे तरी जिल्ह्यातील सर्व ठेवीदार व खातेदार यांनी बहुसंख्येने आंदोलनात सहभागी व्हावे असे अवाहन भिमराज लोखंडे, भास्कर झाल्टे, विष्णु चव्हाण, रामदास दुभासे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरून....बाराविच्या विद्यार्थ्यांना बोर्डाचा दिलासा

सभेच्या अहवालावरून निदर्शनास आले. त्रुटी असलेल्या प्रश्नांचे गुण विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने देण्याचे, याबाबत भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे, असे राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रकटनाद्वारे स्पष्ट केले आहे.

# पान १ वरून...मनमाड न.पा.शाळा इमारत नूतनीकरण कामांचे भूमिपूजन संपन्न





याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील हांडगे, तालुकाप्रमुख साईनाथ गिडगे, मनमाड शहरप्रमुख मयूर बोरसे, बांधकाम विभागाचे खैरनार साहेब, शिक्षण अधिकारी चंद्र मोरे मॅडम, महिला आघाडी तालुकाप्रमुख विद्याताई जगताप मनमाड शहर प्रमुख संगीताताई बागुल, नाझमा मिर्झा, मोहिनी ताई राजाभाऊ अहिरे, मंदाताई भोसले, शाहीन शेख, सरला गोगळ, अलका कुमावत, नांदगाव शहर प्रमुख रोहिणी ताई मोरे, डॉ.वर्षा झाल्टे, गालिबभाई शेख, आमीन पटेल, वाल्मीक आप्पा आंधळे, अज्जू शेख, लाला नागरे, दिनेश घुगे, गोविंद रसाळ, धिवर बाबुजी, रुपेश आहीरे, रविभाऊ खैरनार ललित रसाळ, गोकुळ परदेशी, अमजद पठाण, मिलिंद उबाळे, लोकेश साबळे, सचिन दरगुडे, आनंद दरगुडे, अजिंक्य साळी, राहुल साबळे, दीपक जोरणे, विलास परदेशी, मोहसीन पठाण, मजहर खान, अरबाज शेख, निसार पठाण, चैतन्य परदेशी, जमीर शेख, आसिफ शेख, जय अहिरे, जॉनी जॉर्ज, प्रमोद अहिरे, विलास परदेशी,अज्जू पठाण, नितीन राजपूत, बाजीराव चव्हाण, अर्जुन सोनवणे, संदीप निकम, गुलाब जाधव, आनंदा गवळी, नितीन वामने, निलेश व्यवहारे, कुणाल विसापूरकर आदींसह मोठ्या संख्येने शिवसेना, युवासेना, महिला आघाडी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

BIS
100% Hall Marked Jewellery

## आमच्याकडे कोणतेही BIS प्रमाणित ९१६ हॉलमार्क दागिने मोडताना घट येत नाही.

## कोणत्याही आणि कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका.

* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी करणे नुकसानदायक आहे.
* हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणुक होऊ शकते.
* 22 K 916 हॉलमार्कच्या दागिन्यांना डाग नावाचा प्रकार नसतो.
* फक्त 916 22 K मार्किंग म्हणजे हॉलमार्क नसतो. त्यावर BIS चा लोगो सुध्दा असला तरच तो दागिना ओरिजनल हॉलमार्क असतो.
* BIS हॉलमार्क दागिने खरेदी करण्याचे फायदे.
* हॉलमार्क असलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणूक होत नाही.
* भारत सरकार प्रमाणित लॅबमध्ये दागिन्यांची पारख होते व दागिना शुध्द असेल तरच त्याच्यावर हॉलमार्किंग केली जाते.
* BIS 916 22 K हॉलमार्क दागिने मोडतांना कसलीही डागाची घट कापली जात नाही.
* हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांना मजुरी ही प्रती ग्रॅममागे लागते. ती ही कॅरेट च्या योग्य भाव प्रमाणे. आणि तीच आधी समजावून घ्या. शंका असल्यास आम्हाला संपर्क करा.
* २० कॅरेट, २२ कॅरेट हॉलमार्क सोन्याचे भाव आणि २३ कॅरेट, २४ कॅरेटसोन्याचे भाव हे हे वेगवेगळे असतात.
* नवीन हॉलमार्क सक्तीचे कायदे हे ग्राहक हितासाठीच बनलेले आहेत.
* साध्या (estimate, qotation लिहिलेले) पावतीवर व्यवहार केल्यास तुमची फसवणूक अटळ आहे. GST चे पक्के बिल मागून घ्या.
* दागिने खरेदी खरेदी केल्यावर GST चे पक्के बिल मागून घ्या आणि ते मिळत नसेल तर तेथून दागिने खरेदी करू नका. अन्यथा तुम्ही फसवले जाऊ शकता.
* तुमचे याआधी खरेदी केलेले दागीने सुध्दा योग्य भावाप्रमाणे मोडले जाऊ शकतात ते मोडता येणार नाही. घट जास्त येईल. कमी भाव मिळेल हा अपप्रचार केला जात आहे.
* जुने दागिने हॉलमार्कचे नसतील तरीही त्यांची किंमत कमी होत नाही हे लक्षात ठेवा.
* रोजचे सोने-चांदीचे भाव जाणून घेण्यासाठी आम्हास संपर्क करा.

# कंचन ज्वेलर्स

४५७, सराफ बाजार, मनमाड



दिपक गोयल
सचिव : सराफ सुवर्णकार असो. मनमाड
सरचिटणीस : भाजपा मनमाड शहर
मो.9960931414

# संत झेवियर हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी घेतला मतदान प्रक्रियेचा अनुभव



मनमाड : येथील सेंट झेवियर हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना लोकशाहीतील मतदान प्रक्रियेचा अनुभव देण्यात आला. त्यासाठी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली. उमेदवारी फॉर्म भरणे, माघार घेणे, चिन्ह वाटप, प्रचार अशा क्रमवार प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी स्वप्नील बाकळे सर यांनी निवडणूक प्रक्रिया प्रमुख म्हणून काम पाहिले तर सुधाकर कातकडे, अरविंद दळवी अजिंक्य जाधव, सौ.ज्योती वाघ मॅडम, डॅनियल जगधने यांनी सहकार्य केले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक फादर मॅल्कम नातो यांनी काम पाहिले. तसेच विजयी उमेदवारांची नावे घोषित करून त्यांचे अभिनंदन केले.

सदरच्या निवडणूकीत शाळा नायक, शाळा नायिका तसेच क्रीडा नायक व क्रीडा नायिका या पदासाठी एकूण १६ विद्यार्थी उमेदवार म्हणून उभे होते. इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांना मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला होता. ओळखपत्रासाठी विद्यार्थ्यांकडे असलेली शाळेची दैनंदिनी प्रमाण मागण्यात आली. मतदान करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बोटावर शाई लावण्यात आली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी देखील आपला मतदानाचा हक्क बजावला. या ऑनलाइन निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण प्रणाली तयार करण्यासाठी ब्रदर वेन्सिल, ब्रदर इन्फंट, ब्रदर योहान यांनी विशेष सहकार्य केले.

# आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये व्यवस्थापन समितीची सहविचार सभा संपन्न



मनमाड : मराठा विद्या प्रसारक संचलित, आदर्श इंग्लिश मिडियम स्कुल मध्ये शनिवार दिनांक ४ मार्च २०२३ रोजी स्थानिक / शालेय व्यवस्थापन समिती ची सहविचार सभा संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष दामू आण्णा पाटील हे होते. शाळेचा सर्वांगिण विकास, गुणवत्ता पूर्ण शिक्षण, उपक्रम युक्त शिक्षण, तसेच शिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थी संख्या अशा विविध विषयांवर साधक बाधक चर्चा घडून आली. सर्व सदस्यांनी चर्चेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला. सहविचार सभेसाठी मविप्र. नांदगाव तालुका संचालक अमित बोरसे पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. मिटिंग साठी स्थानिक/ शालेय व्यवस्थापन समिती चे सदस्य फकिराशेठ शिवदे, सुनील साबळे, बरडीया पारसमल, हिरामण कुसमाडे, श्रीम. मुमताज बेग आपा , श्रीम. अफरोज शेख, नरेंद्र कांबळे, दादा सईद, सुभाष वाघ, अरविंद शिंदे, सुहास जाधव, सिद्धार्थ संसारे, आदी मान्यवर उपस्थित होते. मिटिंग चे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. पुनम डी. मढे यांनी केले. तर सूत्रसंचालन श्रीम. रुपाली मॅडम यांनी केले.




मनमाड : मविप्र संचलित, कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय व आदर्श इंग्लिश मेडिअम स्कुल मध्ये राजभाषा मराठी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी श्री.कवडे सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.डी.डी.गव्हाणे सर हे होते. विद्यार्थी भाषणे, काव्य वाचन, लोकनृत्य, आदी कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.पुनम डी. मढे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मनमाड महाविद्यालयात मराठी राजभाषा दिनानिमित्त ग्रंथदिंडी व व्याख्यान संपन्न




मनमाड : मराठी भाषेत निर्माण झालेले साहित्य हे आजवर भाषेच्या गोडव्याने आणि त्यातील लहेजाने वाङ्मयाच्या रूपाने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचले आहे. मराठी भाषा केवळ समृध्दच नाही तर आगामी काळात तिची ज्ञानभाषा म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी शासन आणि मायबोलीवर प्रेम करणारे समस्त मराठी प्रेमी लोक यांनी एकत्र येऊन मराठीला ज्ञानभाषा करण्याचा संकल्प कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी करूया, असे आवाहन महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मनमाडचे प्राचार्य डॉ.अरूण पाटील यांनी केले.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक तात्यासाहेब शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मनमाड महाविद्यालयात मराठी विभाग तसेच महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी डॉ. पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.शेंडगे प्रा.डॉ.मिलिंद अहिरे, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.युवराज भामरे प्रा.अमर ठोंबरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ.पवनसिंग परदेशी, ग्रंथपाल राहुल लोखंडे, शिंदे सर आदी यावेळी उपस्थित होते. डॉ.पाटील पुढे म्हणाले की, मराठी भाषा समृद्ध असूनही अनेक वर्षांपासून तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकला नाही ही खंत आहे. मराठीत इतके दर्जेदार साहित्यिक असून तिला वैभवशाली अशी संत परंपरा लाभलेली आहे. याशिवाय मराठीत लेखन करणारे उदयोन्मुख साहित्यिक यांनी देखील मराठी साहित्य समृद्ध केले आहे, आणि करत आहेत. परंतु अभिजात भाषेचा दर्जा मराठीला अजून मिळू शकला नाही. या पुढील काळात तरी तो मिळावा, यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. डॉ. पाटील यांनी यावेळी त्यांचा स्वित्झर्लंडमधील एक प्रसंग सांगितला. ते स्वित्झर्लंडला गेले असताना त्यांना तिथे एक मराठी भाषिक व्यक्ती आढळला. त्याचे आडनाव देशमुख होते. आणि प्राचार्य पाटील यांनी त्यांना ओळख करून देताना आपणही महाराष्ट्रीयन असल्याचे सांगितले. आणि आपले आडनाव पाटील असल्याचे सांगितले. त्यावेळी कुठलाही संबंध नसताना केवळ मराठी भाषिक आहेत म्हणून त्या माणसाने प्राचार्य पाटील यांना कडकडून मिठी मारली. हे मराठीचे वेगळेपण सांगताना उपस्थितांना गहिवरून आले. मराठी भाषा गौरव दिनाची सुरूवात महाविद्यालयातून ग्रंथ दिंडी काढून करण्यात आली. यावेळी परिसरातील वारकरी संप्रदायातील पंढरपूरला आषाढी, कार्तिकीला वारी करणारे वारकरी गुणिजन, गायक वादक यांनी टाळ मृदंगाच्या ठेक्यात, ग्रंथ दिंडीत सहभाग घेतला. मनमाड शहरातून ग्रंथ दिंडीला विद्यार्थी, व विद्यार्थीनीनि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ज्ञानोबा तुकोबांचे अभंग म्हणणाऱ्या ग्रंथ दिंडीने परिसरातील लोकांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पवनसिंग परदेशी यांनी केले. तसेच डॉ.युवराज भामरे, प्रा. अमर ठोंबरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी पूजा पिंगट तनिषा राऊत यांनी सूत्रसंचालन केले. मराठी भाषा गौरव दिन असल्याने सर्व विद्यार्थिनींनी पारंपारिक साडी परिधान करून ग्रंथदिंडीत सहभाग नोंदवला.

# मनमाड शहरातून कार, मोटरसायकल चोरीस

मनमाड : मनमाड शहर परिसरात मोटरसायकल चोरीच्या घटना सुरू असून शहरातून एक मोटरसायकल व एक कार चोरी गेल्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शहरात मोटरसायकल चोरी इ. चोरीच्या घटना सुरू असतांनाच दि.२५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान येथील मातोश्री हॉस्पिटल, चंद्रभागा लॉन्स समोर उभी केलेली हिरो होंडा स्प्लेंडर प्रो मोटरसायकल क्र.एम.एच.१५ सी.एक्स ०७०१ मोटरसायकल चोरी गेली. याबाबत धनंजय भागाजी सोनवणे रा.मु.पो.निमोण, ता.चांदवड यांनी मनमाड पोलीस स्थानकात फिर्याद दिली असून पुढील तपास पोना.नरोटे करीत आहेत.

चोरीच्या दुसऱ्या घटनेत मनमाड येथील शिक्षक कॉलनी नंबर २, सगळे गॅस पंपाच्या मागे राहत असलेले मच्छिंद्र गवाजी सातपुते यांनी यांच्या घराजवळ उभी केलेली त्यांची मारूती सुझुकी कंपनीची कार एमएच ४१ एझेड ३६६२ सफेद रंगाची कार अंदाजे किंमत ५ लाख ३० हजार २९९ दि.२७।२।२०२३ रोजी रात्री १० ते दि.२८ रोजी सकाळी ७ वाजेदरम्यान चोरी गेल्याची फिर्याद मच्छिंद्र सातपुते यांनी मनमाड पोलीस स्थानकात दिली आहे. याबाबत पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पीएसआय जांभळे करीत आहेत. मनमाड शहर परिसरात मोटरसायकल चोरीच्या घटना थांबत नसल्याने चोरांना पकडण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. यामुळे पोलिस आता या चोरांना कधी पकडता याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# न.पा.सफाई कर्मचाऱ्यांची कार्यशाळा संपन्न; शहरातील विविध भागात स्वच्छतेबाबत जनजागृती

मनमाड (का.क्षेत्र प्रतिनिधी) मनमाड नगर परीषदेचे मुख्याधिकारी डॉ.सचिनकुमार पटेल, आरोग्य निरीक्षक विजयकुमार सोनवणे यांच्या आधिपत्याखाली प्रभाग सुपरवायझर राजेंद्र धिंगाण, प्रभाग प्रमुख सुरज चावरीया, संतोष वानखेडे, बाळू सकंट यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता कर्मचाऱ्याची कार्यशाळा व स्वच्छता मोहिम मनमाड शहरातील विविध भागामध्ये घेवून नागरिकांशी संवाद साधून जनजागृती करण्यात आली. शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांना कचरा वर्गीकरण बाबत संवाद साधून जनजागृती करीत सर्वांना कचऱ्याचे घटक समजावून सांगण्यात आले. ओला कचरा, सुका कचरा आणि घातक कचरा तसेच यामध्ये येणाऱ्या घटकांची सविस्तर माहिती दिली. यावेळी सागर आहिरे, विजय घुगे, संजय छजलाना, संजय देठे, राजू खलसे, शशी धिंगान, उमेश चुनियान, भास्कर हरी , मुकेश साळवे, सुजीत टाक, मनोज चावरिया आदी कर्मचारी उपस्थित होते.

# मनमाड नगरपालीकेतर्फे थकबाकी वसूली मोहीम भरणा केल्याबद्दल पालिकेच्या वतीने डस्टबीन भेट




मनमाड : मनमाड नगर परिषदेतर्फे शहराच्या विविध भागामध्ये थकीत पाणीपट्टी व घरपट्टी धडक वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे. पालिका प्रशासनाद्वारे नागरीकांना लवकरात लवकर थकित पाणीपट्टी, घरपट्टी भरण्याच्या सूचना देण्यात येत आहे.

झोन क्र.०६ चे थकीत रक्कम ११००० व १०००० रूपये भरणा केल्या बद्दल त्यांचा पालिकेच्या वतीने कार्यालयीन अधिक्षक राजेंद्र पाटील, कर अधिक्षक शरद बोडके याच्या हस्ते डस्टबीन वाटप करण्यात आले. याप्रसंगी झोन प्रमुख अशोक कटारे, नितीन पाटील, मनोज मगर, कैलास पाटील, नवनाथ भवर, आदी कर्मचारी उपस्थित होते.

# संत झेवियर विद्यालयात मराठी गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा



मनमाड : येथील संत झेवियर विद्यालयात मराठी भाषेचा प्रचार व प्रसार उपक्रमांतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, वाचन प्रेरणा दिन आणि मराठी गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या पंधरवड्याच्या उद्घाटनपर भाषणातून शाळेचे मुख्याध्यापक फादर मॅल्कम नातो यांनी वाचनाचे महत्त्व सांगितले. गटशिक्षणाधिकारी प्रमोद चिंचोले यांनी मराठी भाषेचे महत्त्व विषद केले. त्यानंतर दर दिवशी एक साहित्यिक व त्यांचे गाजलेली पुस्तके त्याचप्रमाणे शालेय ग्रंथालयात येणाऱ्या छात्र प्रबोधन, हसरी दुनिया, किशोर इत्यादी मासिकांची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली. या उपक्रमामध्ये वाले हेमंत, खंडू गोडगे अशोक गायकवाड, सुनील कुमार कटारे, सौ.जयश्री पारखे, सौ.योगिता गोडळकर, सौ.लीना जाधव, सौ. रचना आहिरे, सौ.ज्योती वाघ, सौ.सरिता निकम यांनी यात सहभाग घेतला होता.

शाळेतील ग्रंथालयात असणाऱ्या सर्व पुस्तकांचे प्रदर्शनही या पंधरवड्यात आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी शाळेचे ग्रंथपाल महिंद्र परदेशी सर आणि आठवीच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर हेमंत वाले यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्याबद्दल व त्यांच्या जीवन प्रवासाबद्दलची संकलित केलेली वृत्तपत्रातील कात्रणे भित्तिपत्रकावर लावून विद्यार्थ्यांना त्यांची व त्यांच्या साहित्याची ओळख करून दिली. सौ. जयश्री पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी हनुमंत चांदगुडे यांची 'आळाशी' ही कविता सादर करून त्याबद्दल माहिती दिली. सदरहू उपक्रमास शाळेच्या पर्यवेक्षिका सिस्टर ज्योत्स्ना व फादर लॉईड यांचे मार्गदर्शन लाभले.

# केआरटी हायस्कूलमध्ये पालकांसाठी मार्गदर्शन सभा संपन्न

मनमाड : कवी रबिंद्रनाथ टागोर इंग्लिश स्कूल, मनमाडमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी आर.टी.ई. अंतर्गत २५% राखीव व मोफत जागांसाठी प्रवेश प्रक्रियेबाबत गुरूवार, दि.२ मार्च २०२३ रोजी स.११.०० वा. कवी रबिंद्रनाथ टागोर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये पालकांसाठी मार्गदर्शन सभा आयोजित करण्यात आली होती.

चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राथमिकचे मुख्याध्यापक दिपक व्यवहारे यांनी मांडले तर बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ व २०११ यातील कलम १२ (१)(सी) नुसार २५% जागा वंचित व दुर्बल घटकांतील मुलांमुलींसाठी राखीव ठेवण्याच्या असलेल्या तरतुदीबाबत व प्रवेशप्रक्रियेबाबत सविस्तर माहिती शाळेचे प्राचार्य मुकेश मिसर यांनी उपस्थित पालकांना दिली.

सदर प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन राबविण्याबाबत शासनाकडून संभाव्य वेळापत्रक जाहिर झालेले असून त्यासाठीचे संकेतस्थळ www.rte25admission.maharashtra.gov.in असे आहे. ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन होणार असून दि. १ मार्च २०२३ ते १७ मार्च २०२३ या कालावधीत पालकांनी ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहे.

२५% प्रवेशासाठी वंचित घटक जसे एस.सी., एस.टी, व्हि.जे., एन.टी., ओबीसी, एस.बी.सी. इत्यादी प्रवर्गाचा समावेश आहे व दुर्बल घटकासाठी खुला प्रवर्ग व अल्पसंख्यांक शिवाय दिव्यांग विदयार्थी इत्यादींचा समावेश आहे. ऑनलाईन प्रवेशासाठी जन्माचे प्रमाणपत्र व वास्तवाचा पुरावा तसेच बालकाचे दि.३१ डिसेंबर रोजी ६ वर्ष वय प्रवेशास पात्र आहे. वंचित घटकांतील प्रवर्गासाठी पालकांचे जात प्रमाणपत्र अनिवार्य आहे. तर दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांनं करीता १ लाखापेक्षा कमी असलेले कायदयात नमूद सक्षम आधिका-याचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे. दिव्यांग विदयार्थ्यांकरीता ४०% पेक्षा जास्त अपंगत्वाचे समक्ष आधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. याशिवाय घटस्फोटीत आई, विधवा महिला, अनाथ बालके, कोव्हीडबाधीत व एचआयव्ही बाधीत बालके यांच्यासाठीही कायदयात नमुद कागदपत्रांप्रमाणे प्रवेश अर्ज करता येईल.

पालकांनी वरीलप्रमाणे विहीत मुदतीत प्रवेशप्रक्रिया पुर्ण करावी. चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्यास प्रवेश रद्द होतील याची नोंद घ्यावी. ऑनलाईन पध्दतीने मुदतीत अर्ज भरल्यानंतर सोडत पध्दतीने प्रवेश मिळालेल्या पालकांनी विहीत मुदतीत पडताळणी समितीकडून पडताळणी करून आपापले प्रवेश दिलेल्या मुदतीतच निश्चित करावेत. तसेच माहितीसाठी शाळेमध्ये दर्शनी भागास लावलेल्या माहितीफलकाची व त्यावर नमुद शासनपत्र काळजीपुर्वक पहावेत व संपुर्ण प्रवेशप्रक्रियेस शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले शासननिर्णय, त्यातील नियम व अटी अंतिम व बंधनकारक असतील असे श्री. मुकेश मिसर यांनी नमूद केले. तरी वंचित व दुर्बल घटकातील पात्र बालकांच्या पालकांनी सदर प्रवेशप्रक्रियेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. मुकेश मिसर यांनी केले. सदर प्रवेशप्रक्रिया संपुर्णपणे ऑनलाईन व लॉटरी पध्दतीने आहे. प्रवेश मिळणे अथवा अपात्र ठरणे यासाठी मुख्याध्यापक, शालेय प्रशासन, संस्था व संबंधित शिक्षणविभाग जबाबदार नाही याची पालकांनी नोंद घ्यावी. पालकांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे राम महाले आणि सौ. गौरी जोशी यांनी दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. वैभव कुलकर्णी, श्री. धनंजय निंभोरकर, सौ. ज्योती खैरे व सौ. राजश्री बनकर यांच्यासह इतर शिक्षक-शिक्षिका यांचे सहकार्य लाभले.

# संत झेवियर हायस्कुलमध्ये कुसुमाग्रज यांची जयंती राजभाषा दिन म्हणून साजरी



मनमाड : येथील सेंट झेवियर हायस्कूल मध्ये कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची जयंती मराठी राजभाषा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक फादर मॅल्कम नातो, पर्यवेक्षिका सिस्टर ज्योत्स्ना, विद्यार्थी प्रतिनिधी पूजा डगळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांनी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. तर कुमारी पूजा डगळे या विद्यार्थिनीने कुसुमाग्रज यांचा जीवनपट आपल्या भाषणातून उघडून दाखवला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक फादर मॅल्कम यांनी मराठी भाषेबद्दल गौरवास्पद अशी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनया मुळे हिने केले तर आभार प्रदर्शन आर्यन उगले या विद्यार्थ्याने केले. भूषण बिडगर व शितल साळवे यांचेही या कार्यक्रमास विशेष सहकार्य लाभले. इयत्ता पाचवी 'ड'च्या विद्यार्थ्यांनी वर्ग शिक्षिका श्रीमती सरिता देवरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली 'माय मराठी' हे गीत सादर केले. तर इयत्ता आठवीच्या वर्गातील मुलांनी वर्गशिक्षिका सौ. लीना जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली 'सर्वात्मका शिवसुंदरा 'ही प्रार्थना सादर केली.

# मनमाड महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा




मनमाड : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. भारताचे प्रथम नोबेल पुरस्कार विजेते वैज्ञानिक डॉ.सी.व्ही.रमण यांनी २८ फेब्रुवारी १९३० ला रॅमन इफेक्ट हा शोधनिबंध सादर केला व त्या शोधासाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला. या शोधाच्या सन्मानार्थ २८ फेब्रुवारी १९८७ पासुन विज्ञान, माहिती व तंत्रज्ञान या क्षेत्रात विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या दिनानिमित्त सुरगाणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जी.दिगावकर यांचे 'वैज्ञानिक दृष्टिकोनातून मानवी विकास' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपल्या आसपास घडत असलेल्या प्रत्येक गोष्टींकडे डोळसपणे पाहून त्यातील वैज्ञानिक दृष्टीकोन समजून घेऊन सामाजिक उन्नती करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर करावा जसे की शेतीमध्ये जैविक शेती, वैद्यकीय तंत्रज्ञान असे दाखले त्यांनी दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण पाटील यांनी नॅनो टेक्नॉलॉजी चे महत्व विशद करून ही टेक्नॉलॉजी मानव जीवनाला उपयुक्त असेल हे उदाहरणसह पटवून दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.जे.डी. वसईत, प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. एम.डी अहिरे, सूत्रसंचालन डॉ.राहुल शिंदे तर आभार प्रदर्शन गणित विभाग प्रमुख डॉ.एस.एम.चिंचोले यांनी केले. या कार्यक्रमास विज्ञान विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.डी.जी कापडणीस, डॉ.बी. एस.देसले,प्रा. डब्ल्यू.के.गागरे तसेच विज्ञान विभागाचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) युवक आघाडीचा मनमाडला आनंदोत्सव



मनमाड - नागालँड विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार स्वबळावर विजयी झाले. ७० वर्षा नंतर रिपब्लिकन पार्टी आफ इंडिया चे २ उमेदवार निवडून आले आहे. त्यानिमित्त मनमाड शहरामध्ये विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला आर.पी.आय (आठवले) उत्तर महाराष्ट्र युवा नेते वंदेश गांगुर्डे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच फटाके फोडत मिठाई वाटप करून जल्लोष साजरा करण्यात आला.

या प्रसंगी व्यापारी आघाडी मनमाड शहराध्यक्ष संजय मुनोत, राजेंद्र भाबड, अनिल गुंदेचा, दिपक उबाळे (मा.नगर-सेवक ), गुलाबराव संसारे, जेष्ठ नागरिक रामनाथ ढेंगळे, राजाभाऊ सपकाळे, युवा नेते दिपक साळवे, युवा नेते रवी बनकर, दिलिप भालेराव, राजाभाऊ हॅन्डरी, एकनाथ गायकवाड, आदींसह असंख्य युवा कार्यकर्ते उपस्थित होते.